**विशेष अहवाल**

जावक क्रमांक एसीबी/सातारा/२०१८ - ९८८८
पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
सातारा, दिनांक ०३/११/२०१८

**प्रति,**

मा. महासंचालक,
ला.प्र.वि.,महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय** :- उंब्रज पोलीस ठाणे गु.र.नं. ३४३/२०१८ भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा १९८८ (सुधारीत अधिनियम २०१८ चे) कलम ७ प्रमाणे दाखल गुन्हयाबाबत.

| | | |
|---|---|---|
| १) | पोलीस ठाणे / जिल्हा | उंब्रज पोलीस ठाणे जिल्हा- सातारा |
| २) | गु.र. नंबर व कलम | ३४३/२०१८ भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा १९८८(सुधारीत अधिनियम २०१८ चे) कलम ७ |
| ३) | मुळ तक्रारदाराचे नाव पत्ता | श्रीमती मंदाकिनी प्रदीप कुंभार, सध्या रा. दुर्वांकुर अपार्टमेंट, ए विंग ए -२, बालकुम दादलाणी पार्क ठाणे मुळ रा. कोळे ता. कराड जि. सातारा |
| ४) | फिर्यादी/अन्वेषण अधिकारी | श्री अशोक गोटीराम शिर्के, पोलीस उपअधीक्षक एसीबी सातारा |
| ५) | आरोपी नाव हुद्दा वर्ग व खाते<br><br>अटक व त्यानंतरची कारवाई | श्रीमती शमशाद सलीम शेख, वय - ४० वर्षे, तलाठी किवळ सजा ता.कराड जि. सातारा रा. जुनी पेठ, कठापुर रोड, ता. कोरेगांव जि. सातारा, वर्ग -३ महसुल खाते.<br>दिनांक ०३/११/२०१८ रोजी १२.३६ वाजता आरोपीस अटक करुन दिनांक ०३/११/२०१८ रोजी मा.विशेष न्यायालय कराड येथे हजर केले असता मा. न्यायालयाने त्यांची दि. ०४/११/२०१८ रोजी पर्यंत पोलीस कोठडी अभिरक्षा मंजुर करुन आरोपीस ताब्यात दिले. |
| ६) | अपराध घडला तारीख वेळ व ठिकाण | दिनांक ०२/११/२०१८ रोजी १७.२० वा. किवळ ता. कराड येथील कोतवाल यांचे राहते घरामध्ये |
| ७) | अपराध दाखल तारीख | दिनांक ०३/११/२०१८ रोजी ०५.४२ वा. |
| ८) | लाच मागणी रक्कम | ५०००/- रुपये. |
| ९) | लाच स्विकारली रक्कम | ५०००/- रुपये. |
| १०) | हेतु | तक्रारदार यांचेकडे त्यांचे मयत भाऊ यांचे नांवे असलेली एकुम्याची नोंद कमी करुन इतर हक्कात वारसदार म्हणुन असलेल्या बहिण व भावांची नांवे भोगवटादार सदरी मा. तहसिलदार यांचा आदेश मिळवुन देण्यासाठी व तसा ७/१२ चा उतारा देण्यासाठी |

**तपशील** :- मुळ तक्रारदार श्रीमती मंदाकिनी प्रदीप कुंभार यांनी दिनांक ०२/११/२०१८ रोजी लाच मागणी संदर्भात दिले लेखी तक्रारीचे अनुषंगाने दि. ०२/११/२०१८ रोजी केले पडताळणी व सापळा कारवाईवेळी घडलेल्या घटना व ध्वनिमुद्रीत संभाषण तसेच प्राप्त कागदपत्रांवरुन श्रीमती शमशाद सलीम शेख, वय ४० वर्षे, रा. जुनीपेठ, जिहे-कठापुर रोड, कोरेगांव ता. कोरेगांव जि. सातारा यांनी किवळ सजा ता. कराड जि. सातारा येथे तलाठी म्हणून वर्ग ३, महसुल खाते या लोकसेवक पदावर काम करीत असताना आपल्या अधिकाराचा व पदाचा दुरुपयोग करुन स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी तक्रारदार श्रीमती कुंभार यांचेकडे त्यांचे मयत भावाची नावे किवळ जमीन गट नंबर ६३२ मध्ये असलेली एकुम्याची नोंद कमी करून इतर अधिकारात असले त्यांच्यासह बहीण व भावांची नोंद भोगवटादार सदरी घेण्यासाठी तहसिलदार, कराड यांचा आदेश मिळवुन देण्यासाठी व तसा प्रमाणीत ७/१२ चा उतारा देण्यासाठी ५०००/- रुपये लाच रक्कम मागणी करुन ती लाच रक्कम दिनांक ०२/११/२०१८ रोजी १७.२० वा. किवळ तलाठी कार्यालयात कोतवाल म्हणुन कार्यरत असलेल्या श्रीमती सुभद्रा कारंडे यांचे राहते घरामध्ये स्विकारुन वैध परिश्रमिकाहुन अन्य पारितोषिक म्हणुन आर्थिक फायदा मिळविला म्हणुन माझी त्याचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारणा कायदा सन २०१८) चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सविनय सादर

(अशोक शिर्के)
पोलीस उपअधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,सातारा